पीएच.डी. संशोधन आराखडा

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

‘‘नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा तौलनिक अभ्यास’’

मानव्य विद्याशाखा अंतर्गत भूगोल विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवी करीता सादर केला जाणारा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधिका
गायकवाड जयश्री रामराव
(एम.ए.भूगोल)

संशोधन मार्गदर्शक
प्रा.डॉ.पस्तापुरे भागवत नामदेवराव
एम.ए.भूगोल, सेट पीएच.डी

संशोधन केंद्र
भूगोल विभाग
इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको नविन नांदेड.

ऑगस्ट 2023

‘‘नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा तौलनीक अभ्यास’’

प्रस्तावना

फार पूर्वीपासून मानव हा निसर्गाच्या सानिध्यात राहत आला आहे. कारण निसर्गाच्या सानिध्यातुनच तो आपल्या अन्न, वस्त्र व निवारा या मुलभुत गरजांची पूर्तता करीत होता. आपली उपजिवीका भागविण्यासाठी तो प्राण्यांची शिकार करणे तसेच कालांतराने वनांमधील कंदमुळे,फळे गोळा करीत असे. झाडांची पाने, साली यांचा वापर वस्त्र म्हणुन करीत होता. मानव हा सुरुवातीला जंगलात,प्राण्यांच्या गुहेत राहत होता. त्याचे जीवन भटक्या स्वरुपाचे होते. प्राचीन काळात हत्यारे तयार करण्याचे काम बहुधा पुरुष करत तर कंदमुळे,फळे गोळा करणे,अन्नाची व्यवस्था करणे ही कामे स्त्रीयांकडे असत. बी जमीनीवर पडले तर त्यापासुन नवी रोपे उगवतात हे स्त्रियांना निरीक्षणातून समजले. अशाप्रकारे नवाश्मयुगामध्ये शेतीचा शोध लागला. अशा रितीने अन्न गोळा करणारा माणुस अन्न निर्माता बनला. नवाश्मयुगात मानवाच्या जीवनाला स्थिरता आली. माणसे संरक्षण आणि सोयीसाठी एकमेकांच्या शेजारी घरे बांधून राहु लागली. यातुनच गाव—वसाहती निर्माण झाल्या.

मानव हा शेतीला जोडुन इतर व्यवसाय करु लागला. शेतमाल व इतर वस्तूंच्या भरपूर उत्पादनामुळे व्यापार सुरु झाला. व्यापाराच्या दृष्टीने सोयीस्कर अशा ठिकाणी नगरे निर्माण झाली. अशा रीतीने नागरी संस्कृतीचा पाया घातला गेला. नागरी संस्कृती नद्यांच्या परिसरात निर्माण झाली. भारतात या काळात सिंधू नदीच्या खोऱ्यात नागरी संस्कृती अस्तित्वात आली. आशिया खंडात तैग्रीस, युफ्रेटीस या नद्यांच्या खोऱ्यात आणि आफ्रिका खंडातील नाईल नदीच्या खोऱ्यात नागरी संस्कृती भरभराटीला आल्या.

ज्या मानवी वस्तीमधील बहुसंख्य लोकांचे मुळ व्यवसाय स्थानिक नैसर्गिक साधनसंपत्तीशी निगडीत असतात. म्हणजेच शेती,मासेमारी,खाणकाम अशी कामे करणाऱ्या लोकांची वस्ती ‘‘ग्रामीण वस्ती’’ या नावाने ओळखल्या जावू लागली.

वस्ती भूगोलाची ओळख

वस्ती भूगोल ही मानवी भूगोलाची शाख आहे. वर्तमान काळामध्ये वस्तीच्या अभ्यासाला महत्व प्राप्त झाल्यामुळे भूगोलाच्या वस्ती भूगोल या शाखेत स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे. अनेक भूगोल तज्ञांनी वस्ती भूगोलाची ओळख ही आपल्या व्याख्यांमधुन मांडली आहे ती पुढीलप्रमाणे.

भौगोलिक पारिभाषिक शब्दकोषानुसार (२००४)

''वस्ती भूगोल मानवी भूगोलाची एक विशेष शाखा आहे. ज्यामध्ये वस्तीचा विकास आणि उत्पत्ती, स्थान,प्रतिरुप,प्रक्रिया आणि स्थानिक संघटन यांचे व्यवस्थित वितरण केले आहे.''

स्टोन यांच्या मते (१९६५)

'' वस्ती भूगोलामध्ये घरांच्या वितरणाचा उल्लेख आणि विश्लेषण आहे. ज्याद्वारे मानव हा त्या भूमीशी संबंधित असतो.''

वस्ती किंवा वसाहत या शब्दासाठी इंग्रजीत 'Settlement' असा शब्द वापरला जातो.

वस्त्यांचे कार्यानुसार दोन प्रकार आहेत.

१) ग्रामीण वस्त्या २) नागरी वस्त्या

१) ग्रामीण वस्ती : ज्या ठिकाणी बहुसंख्य लोक प्राथमिक व्यवसायात गुंतलेले आहेत व तेथील लोकसंख्या विरळ आहे. अशा वस्तीस ग्रामीण वस्ती म्हणतात.

ग्रामीण वस्तीचे प्रकार: i) कुटीर वस्ती ii) वाडी

२) नागरी वस्ती : नागरी वस्ती ही मुख्यत: प्रक्रिया, उद्योग करणारी व सेवा पुरविणारी असते.

धर्माबाद व नायगाव तालुक्याचे स्थान व विस्तार

भौगालिकदृष्टया नांदेड जिल्हाचे स्थान हे मराठवाडयाच्या पुर्वेस असुन महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेस आहे. नांदेड जिल्हा दखनच्या पठारावर गोदावरी नदीच्या पात्रात वसलेला असुन १ मे १९६२ रोजी जिल्हाची निर्मीती झाली आहे. नांदेड जिल्हाचे भौगोलिक क्षेत्रफळ १०,५२८ चौ.कि.मी इतके आहे. नांदेड जिल्हातील १६ तालुक्यांपैकी धर्माबाद व नायगाव हे दोन प्रमुख तालुके आहेत. नांदेड जिल्हाच्या पुर्व दिशेला धर्माबाद तालुका आहे. तसेच आग्नेयेला नायगाव तालुका आहे.

धर्माबाद तालुक्याचा अक्षवृत्तीयविस्तार हा १८°५३' उत्तर ते १८°८९' उत्तर, रेखावृत्तीय विस्तार ७७°५०' पुर्व ते ७७°८४' पुर्व असा आहे. तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ३३९.०९ चौ.कि.मी. आहे. धर्माबाद तालुक्याच्या पश्चिमेला नायगाव, दक्षिणेला बिलोली तालुका, उत्तरेला उमरी तसेच पुर्वेस तेलंगणा राज्य नैऋत्येला कुंडलवाडी व कुंटुर ही गावे आहेत. तसेच धर्माबाद तालुक्यामध्ये एकूण ५४ गावे आहेत.

नायगाव तालुका हा नांदेड जिल्हाच्या आग्नेय दिशेला आहे. नायगाव तालुक्याचा अक्षवृतीय विस्तार १८°५२' उत्तर ते १८°८७' उत्तर व रेखावृतीय विस्तार ७७°३०' पूर्व ते ७७°४६' पूर्व असा आहे. या तालुक्याचे क्षेत्रफळ ५९८.९७ चौ.कि.मी. आहे. तालुक्याची एकूण लोकसंख्या १,८२,८६८ एवढी आहे. नायगाव तालुक्यात एकूण ८७

गावे आहेत. नायगाव तालुक्याच्या उत्तरेला मुदखेड, दक्षिणेला मुखेड, पश्चिमेला कंधार, पुर्वेला बिलोली आहे.

विषय व अभ्यास क्षेत्राची निवड

पूर्वी मानव हा मुलभूत गरजांसाठी भटकत होता. आज मानवी जीवनात स्थिरता प्राप्त झाली आहे. आज मानव हा मोठमोठया इमारती,अपार्टमेंट बांधून राहतो. परंतु यापूर्वी मानव हा कोठे राहत होता, त्याचे राहण्याचे ठिकाण, घरांची रचना, स्वरुप, लोकजीवन, संस्कृती, तो जेथे राहत होता तेथील वस्ती, वस्ती चे प्रकार, लोकसंख्या, वस्तीतील अंतर, तेथे मिळणाऱ्या सुविधा, त्यांचे व्यवसाय यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणुन प्रस्तुत संशोधनासाठी ''नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा तौलनिक अभ्यास'' या विषयाची निवड केली आहे.

धर्माबाद व नायगाव हे दोन्ही तालुके एकमेंकांना लागून आहेत. दोन्ही तालुक्यांमधून गोदावरी नदी वाहते.

महाराष्ट्र राज्यातील मीरची उत्पादनासाठी प्रसिध्द असणारा धर्माबाद तालुका तसेच बाभळी बंधारा यामुळे नावाजलेला धर्माबाद हा तालुका आहे. धर्माबादच्या पुर्वेला तेलंगणा राज्याची सीमा आहे. मुंबई काचीगुडा लोहमार्ग नांदेड जिल्हातील नांदेड, मुदखेड व धर्माबाद या तालुक्यांना जोडतो. धर्माबाद तालुक्यातील जमीन सुपीक काळीचे असुन तेथे ज्वारी, हरभरा, गहू, मीरची, कापूस, सोयाबीन, मूग, उडीद अशी पिके घेतली जातात. धर्माबाद तालुका मुंबई, हैदराबाद, निजामाबाद, नांदेड, सिकंदराबाद या प्रमुख शहरांशी तसेच तेलंगणा राज्याशी रेल्वे मार्गाने जोडला आहे. धर्माबाद हे दक्षिण मध्य रेल्वेचे सर्वात मोठे उत्पन्न देणारे स्टेशन आहे. धर्माबाद शहर हे एम.एस.आर.टी.सी या बससेवेव्दारे इतर शहरांशी जोडलेले आहे. येथे मराठी, तेलगू, कन्नड या भाषा बोलल्या जातात.

नायगाव येथे प्रसिध्द गुरांचा बाजार जेथे भरतो नांदेड, हैदराबाद रोड वर असलेले नायगाव शहर उद्योग व्यापार , कपडयासाठी तसेच आठवडी बाजारासाठी प्रसिध्द आहेत. नायगाव तालुक्यातील जमीन काळी कसदार व मुरमटी असुन काही ठिकाणची जमीन ओलीताखाली तर काही कोरड वाहू आढळते. सोयाबीण, कापूस, हळद, हरभरा, टाळकी इ. पिके घेतली जातात. नायगाव तालुक्यात मराठी भाषीक आहेत. नायगाव तालुक्यातील गंगनबीड व कोलंबी येथे मोठी जत्रा भरते. अशा पध्दतीने हा तालुका सामाजिक, सांस्कतिक व भौगोलिकदृष्टया संपन्न आहेत.

अशा या वैशिष्टयपूर्ण धर्माबाद व नायगाव या तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा तौलनिक अभ्यास संशोधन विषयातुन करावयाचा आहे.

संशोधनाची उद्दिष्टये:

१) नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या प्राकृतिक व सामाजिक रचनांचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वसाहतींच्या उत्क्रांतीचा अभ्यास करणे.

३) नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचे वितरण आणि वाढ यांचा अभ्यास करणे.

४) नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या स्थान, प्रकार व प्रारुपांचा अभ्यास करणे.

५) नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वसाहतीची अंतर्गत रचना आणि बांधकाम साहित्याचा अभ्यास करणे.

६) नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण सेवा केंद्रांचा अभ्यास करणे.

गृहितके:

१) ग्रामीण वस्त्यांची निर्मिती ही नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध असलेल्या ठिकाणी झाली आहे.

२) ग्रामीण वस्तीचा आकार आणि ग्रामीण वस्तीमधील अंतर हे सर्व ठिकाणी सारखी दिसून येत नाही.

३) ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारुप यामध्ये भिन्नता आढळुन येते.

४) ग्रामीण वस्तीची वाढ ही नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांच्या अनुकुलतेवर अवलंबुन असते.

५) ग्रामीण वस्तीची वाढ सर्व ठिकाणी सारखी आढळत नाही.

माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती:

प्रस्तूत संशोधन पूर्ण करण्यासाठी प्राथमिक व द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात येईल. माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण, मुलाखत, निरीक्षण व प्रश्नावली या पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तसेच ग्रामीण वस्त्यांच्या प्रारुपांचा अभ्यास करण्यासाठी गावांना स्वत: भेटी देणे, काही निवडक गावांची नमुना सर्वेक्षणासाठी निवड करुन माहिती संकलित करण्यात येईल.

द्वितीयक स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी गुगल अर्थ वेबसाईट, भारतीय स्थल दर्शक नकाशे, विविध संशोधन पत्रिका, विविध संदर्भ ग्रंथ यांचा आधार घेण्यात येईल.

संशोधन पद्धती:

सदरील संशोधनाच्या विश्लेषणासाठी विविध अभ्यासपद्धतींचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यासाठी पुढील सुत्रांचा वापर करण्यात येईल.

१) ग्रामीण वसाहतीचे अंतर काढण्यासाठी वेलेन्टी विडीन यांचे सुत्र:

$$D = \sqrt{\frac{A}{N}}$$

खुलासा D = वस्त्यांच्या दरम्यानचे अंतर

A = तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ

N = तालुक्यातील एकूण वस्त्यांची

२) ग्रामीण वस्त्यांचे प्रकार ओळखण्यासाठी मंडल.आर.बी यांच्या प्रकीर्णन सुचीचा वापर:

$$\text{प्रकीर्णन सुची} = \frac{\text{ग्रामीण वसाहतीच्या सरासरी लोकसंख्येचा आकार (अ)}}{\text{ग्रामीण वस्तीमधील सरासरी अंतर (ब)}}$$

$$\text{अ) वसाहतीच्या सरासरी लोकसंख्येचा आकार} = \frac{\text{एकूण ग्रामीण लोकसंख्या}}{\text{एकूण ग्रामीण वसाहती}}$$

$$\text{ब) वस्तीचे सरासरी अंतर} = \sqrt{\frac{\text{एकूण क्षेत्रफळ (चौ.कि.मी)}}{\text{एकूण वस्ती}}}$$

एकूण वस्ती

३) ग्रामीण वस्त्यांमधील लोकसंख्येची सरासरी काढण्यासाठी सुत्र:

$$S = \frac{P}{N}$$

खुलासा S = ग्रामीण लोकसंख्येची सरासरी

P = एकूण ग्रामीण लोकसंख्यज्ञचौ

N = एकूण ग्रामीण वस्तींची संख्या

४) वस्ती विखरण सुचीचे मुल्य काढण्यासाठीचे सुत्र:

$$\mathbf{DI} = \frac{RPi \times Vi}{Ai^2}$$

खुलासा DI = विखुरण सुची

RPI = मंडळातील एकूण ग्रामीण लोकसंख्या

Vi = मंडळातील एकूण ग्रामीण वस्ती

Ai^2 = मंडळाचे एकूण क्षेत्रफळ

५) Rn मूल्य काढण्यासाठी क्लार्क व ईवान्स यांच्या सांख्यिकी पद्धतीचा वापर

सूत्र : $2d\sqrt{N/A}$

खुलासा Rn = निकट शेजारी विश्लेषण

d = अभ्यास क्षेत्रातील निरीक्षण केलेल्या निकट शेजारी बिंदूतील सरासरी अंतर

N = वस्तीची संख्या

A = तालुक्याचे क्षेत्रफळ चौरस किलोमीटरमध्ये

६) लोकसंख्या वाढीचा दर काढण्यासाठीचे सुत्र $r = \frac{P_1 - P_0}{P_0} \times 100$

खुलासा r = लोकसंख्या वाढ

P_0 = दोन जनगणनेनुसार अगोदरच्या जनगणनेनुसार आलेली लोकसंख्या

P_1 = दोन जनगणनेनुसार नंतरच्या जनगणनेनुसार आलेली लोकसंख्या

७) नकाशा शास्त्रीय स्त्रोताचा म्हणजेच नकाशा ॲटलास आणि भारतीय भूस्थलदर्शक नकाशाचा वापर करण्यात येईल. नकाशा प्रमाण १: १०००००, १: ५००००, १:२५००० या प्रमाणावर काढलेल्या भारतीय स्थलदर्शक नकाशाचा वापर केला आहे.

संदर्भिय साहित्याचे पुर्नरावलोकन

ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास यापूर्वी अनेक संशोधन पत्रिकांमधुन, संशोधकांनी आपल्या संशोधन कार्यातुन तसेच आंतरराष्ट्रीय, देश, राज्य आणि स्थानिक पातळीवरुन करण्यात आला आहे. याचा संक्षिप्त आढावा पुढीन संशोधन कार्यासाठी उपयुक्त ठरेल.

१) भागवत पस्तापूरे (२००८) यांनी नांदेड जिल्हातील ग्रामीण वस्त्यांचा अभ्यास या विषयावर स्वा.रा.तीर्थ मराठवाडा विद्यापिठात शोध प्रबंध सादर केला आह. त्यामध्ये वस्त्यांचे प्रारुप, वितरण, वाढ, सेवाकेंद्र इ. अभ्यास केला आहे.

२) विश्वनाथ (१९५६) यांनी तामिळनाडू राज्याच्या बिलेटिक जिल्हातील ग्रामीण वस्त्यांच्या प्रारुपाचा मृदेशी असणारा संबंध स्पष्ट केला आहे. त्यामध्ये त्यांनी रेषाकृती वस्त्या हया सूपिक मृदेच्या प्रदेशात आढळतात तर गोलाकार वस्त्या काळया मृदेच्या प्रदेशात आढळतात आणि अनाकार वस्त्या उजाड ठिकाणी आढळून येतात असे शोधून काढले आहेत.

३) भट्टाचार्य एन.डी. (१९६५) यांनी पश्चिम बंगाल मधील मूर्शीदाबाद जिल्हामध्ये वस्त्यांचा अभ्यास केला आहे. त्यात त्यांनी वसाहतीची उत्क्रांती, वाढ आणि प्रारुपावर कसा प्रभाव पडतो हे सांगितले आहे.

४) रुड बर्ग एस. (१९५६) यांनी ग्रामीण वस्तींचा संशोधनात्मक अभ्यास करुन वस्तीच्या वितरणावर व वाढीवर भौगोलिक घटकांबरोबरच अन्य घटकांचाही कसा प्रभाव दिसून येतो हे स्पष्ट केले आहे.

५) कनकूरे के.बी. (१९८६) यांनी मराठवाडयातील ग्रामीण व नागरी वसाहतीचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे. या संशोधनात्मक अभ्यासामध्ये मराठवाडयातील वसाहतीच्या उत्क्रांतीपासून ते १९८६ पर्यंतच्या झालेल्या वस्त्यांच्या बदलाचे विश्लेषण केलेले आहे.

६) पटोले बन्सी रंगनाथ यांनी केज व धारुर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास केला आहे.

७) जाधव राहुल प्रदिप यांनी नांदेड जिल्हयातील लोहा व कंधार तहसीलमधील ग्रामीण लोकसंख्या व वस्तीचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

८) पाटील ओमप्रकाश सुभाषराव यांनी देवनी व शिरुर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास केला आहे.

९) लहाने बळीराम शिवाजी यांनी औसा व शिरुर अनंतपाळ तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचां तुलनात्मक अभ्यास केला आहे.

१०) गावित सुनिल सोमा यांनी नंदुरबार जिल्हयातील ग्रामीण वसाहतींचा भौगोलिक

अभ्यास केला आहे.

प्रकरणाची रुपरेषा

प्रकरण पहिले

प्रस्तावना

वस्तीचा अर्थ, अभ्यास क्षेत्राची निवड, उद्दिष्टये, गृहितके, माहितीचे संकलन, संशोधन पध्दती व तंत्र, साहित्याचे पुनरावलोकन, संदर्भ ग्रंथ

प्रकरण दुसरे

नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक व सांस्कृतीक रचना अभ्यासने

प्रस्तावना, स्थान व विस्तार, भूशास्त्रीय संरचना, भूजल, प्राकृतिक रचना, जलप्रणाली, हवामान, मृदा, वनस्पती, भूमी उपयोजन, लोकसंख्येची घनता, ग्रामीण वसाहतीची घनता, नागरी वसाहती व नागरीकरण, संदर्भग्रंथ.

प्रकरण तिसरे

नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वसाहतीच्या उत्क्रांतीचा अभ्यास करणे

प्रस्तावना, पूर्व इतिहासिक कालखंड आणि आर्य कालखंडातील वसाहतीचा उगम, बौध्द, हिंदू, मुस्लिम, ब्रिटीश कालखंडातील वसाहती, ग्रामीण वसाहतीच्या नावाच्या उपपदाचे वितरण आणि विश्लेषण, नैसर्गिक पर्यावरण व सांस्कृतिक पर्यावणाशी संबंधीत ग्रामीण वसाहतींची नावे, संदर्भग्रंथ.

प्रकरण चौथे

नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचे वितरण आणि वाढीचा अभ्यास करणे.

प्रस्तावना, भूपृष्ठ रचनेनुसार ग्रामीण वसाहतीचे वितरण, प्रवाह प्रणालिची घनता आणि ग्रामीण वसाहतीचे वितरण, लोकसंख्येची घनता, कृषिखालील जमिन, सिंचना खालील जमीन, रस्त्यांची घनता, या सर्व घटकांच्या ग्रामीण वसाहतींचे वितरण, ग्रामीण वसाहतीची वाढ, ग्रामीण वसाहतीतील सरासरी अंतर, ग्रामीण वसाहतीतील लोकसंख्या वाढ, संदर्भग्रंथ

प्रकरण पाचवे

नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचे स्थान, प्रकार आणि प्रारुपांचा अभ्यास करणे

प्रस्तावना, ग्रामीण वसाहतीचे स्थान, प्रकार, प्रारुपे, अंतर्गत रचना, प्रारुपांचे प्रादेशिक वितरण, विश्लेषण अभ्यासणे, संदर्भग्रंथ

प्रकरण सहावे

नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण वसाहतीची अंतर्गत रचना आणि बांधकाम साहित्याचा अभ्यासक्रम करणे

प्रस्तावना, ग्रामीण वसाहतीची अंतर्गत रचना

प्रकरण सातवे

नांदेड जिल्हातील धर्माबाद व नायगाव तालुक्यातील ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास करणे

प्रस्तावना, ग्रामीण सेवा सुविधांची क्षमता, प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षणाची सुविधा, आरोग्यकेंद्राची, डाक कार्यालयाची, बॅकेची, आठवडी बाजाराची सुविधा, संदर्भग्रंथ.

प्रकरण आठवे

निष्कर्ष

प्रस्तावना, ग्रामीण वसाहतींच्या अभ्यासाचे निष्कर्ष, शिफारशी

संदर्भ सुची

१. ए.कारखानीस नयना १९९३ वस्ती भूगोल, निराली प्रकाशन पुणे पा.कृ. १ ते ५
२. खतिब के.ए. (२००७) वसाहत भूगोल, मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे.
३. सवदी. ए.बी. केळेकर. पी.एस. (२००५) आधुनिक भूगोल, प्रगती बुक्स प्रा.लि. पूणे
४. डॉ.विठ्ठल घारपूरे नागरी भूगोल पिंपळापूरे पब्लीशर्स
५. भूगोल शास्त्र परिभाषाकोष, भाषा संचनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई २००१
६. भारतीय भूस्थलदर्शक नकाशा.

7. Ali , S.M. (1942) : " Population and settlement in Ghaghar Plain " , Indian Geographical Journal , Vol , 17 , PP . 157-182 .

8. Ahmed , E. (1948) : " A systematic study of rural and urban settlements of Uttar Pradesh (India) " , Ph.D. Thesis submitted to the University of London

9. Badgujar A.A. (2004) : " Geographical aspect of trible settlements in the western satpura region " , unpublished M.Phil . Dissertation , N. M. University , Jalgaon .

10 Brunhes, J 1952 Human Geography , Paris, P. 33

11.Bhattacharya , N.D. (1965) : " Evolution of settlements in Districts of Murshidabad , West Bengal " , unpublished Ph.D. Thesis , B.H. University , Varanashi .

12. Bylund , E. (1956) : Koloniseringen av pite Lappmsrk , t , o , m , av . 1867 . (The colonization of pite Lappmark until 1867) Geographical No. 30 , Uppsala .

13. Chauhan V.S. (1972) : Rural settlements in Upper Yamuna Khaddar region in India , Vol . III , 21 International Geographical Congress , PP . 49-60 .

14.Chaudhari , S.R. (1986) : " Khandesh : A Study of Rural settlements " , unpublished Ph . D. Thesis , University of Poona , Pune .

15. Deshmukh , P.W. (1979) : " A Study of central places in the Upper Krishna Valley " , Ph . D. Thesis , University of Poona , Pune .

16. James, Preston E.Geography of man, Newyork 1958

17. Simons, Martin, The changing world Deserts, Newyork 1967

18. Vishwakosh.marathi.gov.in

संशोधक

गायकवाड जयश्री रामराव
एम.ए.भूगोल

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पस्तापूरे बी.एन.
एम.ए. भूगोल सेट, पीएच.डी